महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत...

## महाराष्ट्र शासन
### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**शासन निर्णय क्रमांक स्वयंअ-२०१३/(८५/१३) (II) /माशि-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दिनांक : ५ ऑक्टोबर, २०१३

संदर्भ :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - १, दिनांक ०४ जानेवारी, २०१३.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ६, दिनांक १९ जानेवारी, २०१३.
३) शासन निर्णय क्रमांक पाशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३
४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ५, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३.
५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ५७, ५८ व ५९, दिनांक २० एप्रिल, २०१३.
६) शासन निर्णय क्रमांक स्वयंअ - २०१३ / (८५/१३)/माशि - १, दिनांक १५ जून, २०१३
७) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक -२४, दिनांक २ जुलै, २०१३

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये दर्जेदार शिक्षण देण्यासाठी व शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाकरीता राज्य शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी " **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** " पारित केला आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ पासून करण्यात आली आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने नवीन शाळांना मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे इत्यादी साठी फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या ७,१०८ अर्जांची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ प्रस्ताव पात्र करण्यात आले होते.

२. शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ साठी पात्र प्रस्तावांची छाननी करीत असतांना निदर्शनास आलेल्या त्रुटी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आलेल्या अडचणी यांचा विचार करता उक्त अधिनियमांच्या काही कलमांमधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव दिनांक ०५

जून, २०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या सदर बैठकीत विभागाच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानुसार विधी व न्याय विभागाच्या सहमतीनंतर त्या संदर्भातील अध्यादेश मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर दिनांक ०२ जूलै, २०१३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रख्यावित करण्यात आला आहे.

३. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ या अधिनियमातील तरतुदीनुसार सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता ज्या शैक्षणिक संस्थांनी नवीन शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी अर्ज दाखल केले होते. परंतू, अधिनियमातील तरतूदींच्या पुर्ततेअभावी त्यांचे प्रस्ताव अपात्र ठरले होते. अशा संस्थांच्या बाबतीत उपरोक्त अध्यादेशातील सुधारित तरतुदींची पूर्तता करुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या संदर्भात छाननी समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवून त्याबाबतचे सुधारित प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी केली असता ८२८ एवढे प्रस्ताव पात्र करण्यात आलेले आहेत. या पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

वरील पार्श्वभूमीवर सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन शाळा सुरु करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता छाननी समितीत्यांकडून कलम ६ (१) अनुसार प्राप्त झालेल्या जिल्हानिहाय अहवालाच्या अनुषंगाने उक्त अधिनियमातील विविध तरतूदी तसेच दिनांक ०२ जूलै, २०१३ च्या अध्यादेशामधील तरतूदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे ८२८ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

२) शाळा दर्जावाढीच्या **१९१** पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबची परवानगी देण्यात येत आहे.

३) नवीन शाळांचे प्रस्ताव - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या **६३७** नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) त्याप्रमाणे उपरोक्त संबंधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापकांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित अधिका-यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या



Deshpande

शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता पहिली पासून परवानगी देण्यात येईल.

५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतूदींनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील (अल्पसंख्यांक विना अनुदानित शाळा वगळून) त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेच्या दर्जावाढ करण्यास पात्र ठरलेल्या त्याचप्रमाणे अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्हयाच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिकरीत्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

८) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबाबतची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १६७ | पुणे | श्री नरसिंह प्रतिष्ठान ता. इंदापूर जि.पुणे. | श्री नरसिंह मराठी माध्यम प्रशाला निमगाव केतकी ता. इंदापूर जि.पुणे | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १६८ | पुणे | शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठान बावडा ता. इंदापूर जि.पुणे. | एस.बी.पाटिल पब्लिक स्कुल बावडा ता. इंदापूर जि.पुणेर | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १६९ | पुणे | गुरुदत्त कला क्रिडा व शैक्षणिक समाजविकास प्रतिष्ठान काटी ता. इंदापूर जि.पुणे. | विश्वप्रतिक प्राथमिक मराठी शाळा काटी ता. इंदापूर जि.पुणे. | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७० | पुणे | सरस्वती शिक्षण संस्था जळोची ता. बारामती जि.पुणे. | सरस्वती विद्यामंदिर जळोची ता.बारामती जि.पुणे | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७१ | पुणे | केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्था मर्यादित, वडगांव बुद्रुक, पुणे | ज्ञानसाधना विद्यामंदीर, वडगांव बुद्रुक, ता.हवेली, जि.पुणे | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७२ | पुणे | कला प्रसार शिक्षण संस्था भरणेवाडी ता. इंदापूर जि.पुणे. | क्रियेटिव्ह माईडलेस ॲकेडमी भरणेवाडी ता. इंदापुर जि.पुणे. | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७३ | पुणे | पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, बलार्ड इस्टेट, मुंबई-१ | पवार पब्लिक स्कूल, नांदेड सिटी, स.नं.२२, सिंहगड रोड, ता.हवेली | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७४ | पुणे | श्री गजानन महाराज एज्युकशन सोसायटी, गोऱ्हे बुद्रुक, पो.डोणजे, ता.हवेली | नोबल ब्लुमिंग बडस स्कूल, गोऱ्हे बुद्रुक, पो.डोणजे, ता.हवेली | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७५ | पुणे | गोदाई प्रतिष्ठान, विश्रांतवाडी, पुणे | सिया इंग्लिश मिडीयम स्कूल, पारगांव (सा.मा) ता.दौंड | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७६ | पुणे | कन्नड संघ, पुणे, एरंडवणे, पुणे-४ | कावेरी पब्लिक स्कूल, लोहगांव, वडगांव शिंदे रोड,ता.हवेली | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७७ | पुणे | सिध्दी एज्युकेशन सोसायटी ॲंड रिसर्च फौंडेशन, येणेरे , ता.जुन्नर | इंडियन इंग्लिश मिडीयम स्कूल, येणेरे, ता.जुन्नर | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७८ | पुणे | माउंट झायन एज्युकेशन टस्ट , हडपसर | अंबंडट लाईफ स्कुल, महमदवाडी हडपसर | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १७९ | पुणे | सिध्देश्वर शिक्षण संस्था, देऊळगांव राजे, ता.दौंड | श्रीमती शांताबाई काळूराम ठोंबरे प्राथमिक विद्यालय, (इंग्रजी माध्यम) देऊळगांवराजे, ता.दौंड | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |

## महाराष्ट्र शासन
विवरणपत्र- १

# महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत कलम ७(१) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावाची यादी

शासन निर्णय क्र.-स्वयंअ २०१३/(८५/१३)(II)/मशि-१, दिनांक :- ५ अक्टोबर २०१३ चे सहपत्र

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | उत्तर मुंबई | गोवंडी एज्युकेशन सोसायटी, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पू), मुंबई ४०० ०८८ | श्री. हशू अडवाणी मेमोरिअल स्कूल, भक्त कवी शिवाजी भाई देवशी मार्ग, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पू) मु. ८८ | इंग्रजी (s.s.c) | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २ | उत्तर मुंबई | शर्मा शिक्षण संस्था, नेताजी नगर, खाडी नं. ३, जरीमरी कुर्ला (प), मुंबई ७२ | शर्मा इंग्रजी हायस्कूल, नेताजी नगर, खाडी नं. ३, जरीमरी, कुर्ला (प), मुंबई ७२ | इंग्रजी (s.s.c) | दर्जावाढ | पात्र | माध्यमिक |
| ३ | मुंबई पश्चिम | प्रियंका चॅरिटेबल ट्रस्ट | डॉ. एच. बी मिश्रा ज्यू. कॉलेज ऑफ आर्टस सुधीर निवास, एस एन दुबे रोड, रावलपाडा, दहिसर पूर्व मुंबई ६८ | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| ४ | मुंबई पश्चिम | जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटी, जोगेश्वरी (पू), मुंबई | जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटीचे कनिष्ठ रात्र महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई | इंग्रजी | नवीन | पात्र | उच्च माधामिक |
| ५ | मुंबई पश्चिम | .अल मुस्तफा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी | ए एम इंग्लिश स्कूल, गेट नं.७ , मालवणी मालाड पश्चिम मुंबई ४०००९५ | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | प्राथमिक |
| ६ | मुंबई पश्चिम | बी. आर. एज्युकेशनल ट्रस्ट | सर जे आर हायस्कूल,जोसेफ पटेल रोड मालवणी गेट नं . ८ , मालवणी , मालाड पश्चिम मुंबई ४०००९५ | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | पायमिक |
| ७ | मुंबई पश्चिम | कला विद्यालय ट्रस्ट | श्रीमती के बी पाटील इंटरनॅशनल स्कूल, जोगेश्वरी पूर्व मुंबई -६० | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| ८ | मुंबई पश्चिम | सांताक्रुझ शिक्षण संस्था | इंग्रजी कुडोस किडस सें.कडरी स्कूल, टी पी एस ११ वा रस्ता, व्ही एन देसाई हॉस्पिटल जवळ, सांताक्रुझ पूर्व मुंबई ४०००५५ | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | माध्यमिक |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३१००७११३७५८९६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Krishnrao Thube

Digitally signed by Prakash Krishnrao Thube
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Krishnrao Thube
Date: 2013.10.18 16:26:50 +05'30'

**(प्रकाश ठुबे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई
४. महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय , मंत्रालय, मुंबई
५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषदा,
७. सर्व शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई(पश्चिम/उत्तर/दक्षिण)
८. मा.मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
९. मा.राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
१०. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
११. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१२. उपसचिव, अर्थसंकल्प शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व सह / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्तीमाशि-१

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम- २**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १७ जून, २०१६

वाचा:-

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक मासप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

प्रस्तावना:-

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठ, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

Scanned with

३७४३ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ३७४३ शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देण्यात येत आहे.

२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुर्दीची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच <u>रद्दबातल</u> ठरेल.

क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे <u>बंधनकारक</u> राहील

२.४ सदर आदेश संबधित संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची

खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२.७ यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

(रा. ग. गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०. सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११. निवडनस्ती (एसएम-२).



Scanned with CamScanner

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १०३४ | पुणे | [illegible] एज्युकेशन सोसायटी पुणे [illegible] पुणे ४११००४ | डी ई एस इंग्लिश मिडीयम स्कूल शिरूर [illegible] , शिरूर , ता. शिरूर जि. पुणे . | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ६ वी ते १२ वी) | इंग्रजी |
| १०३५ | पुणे | बालाजी शिक्षण प्रसारक मंडळमु पो. [illegible] मु.ता.शिरूर जि.पुणे | बालाजी उच्च प्राथमिक विद्यालय[illegible] रोड शिरूर | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | मराठी |
| १०३६ | पुणे | श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज प्रतिष्ठानमु पो [illegible] ता बारामती जि पुणे | संत तुकाराम महाराज प्राथमिक विद्यालयमु पो [illegible] ता बारामती जि पुणे ४१३१०२ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | मराठी |
| १०३७ | पुणे | चाकण शिक्षण मंडळ चाकणआगरवाडी रोड, चाकण ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | [illegible] प्राथमिक विद्यामंदिर चाकणआगरवाडी रोड चाकण ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | मराठी |
| १०३८ | पुणे | श्री छत्रपति संभाजी राजे शिक्षण संस्थामु पो [illegible] ता. पुरंदर जि.पुणे ४१२३०१ | हिलटॉप उच्च प्रायमरी स्कूल [illegible] मु.पो [illegible] ता. पुरंदर जि. पुणे ४१२३०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०३९ | पुणे | श्री गजानन महाराज एज्युकेशन सोसायटी गोऱ्हे बुद्रुकगट न. २४२, गोऱ्हे बुद्रुक, तालुका हवेली, जिल्हा पुणे, पिन-४११०२५. | [illegible] स्कूलिंग [illegible] स्कूलगट न. २४२, गोऱ्हे बुद्रुक, तालुका- हवेली, जिल्हा-पुणे, पिन-४११०२५. | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४० | पुणे | सिद्धी एज्युकेशन सोसायटी आणि रिसर्च फाउंडेशन मु.पो.- येणेरे , ता.- जुन्नर जि., पुणे , पिन -४१०५०२ . | इंडियन इंग्लिश मिडियम स्कूलमु.पो.- येणेरे , ता.-जुन्नर जि , पुणे , पिन - ४१०५०२ . | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४१ | पुणे | एस ए.एज्युकेशन ट्रस्टतुन्गागाव , सायंन विहार रोड , मुंबई | शिवाजीराव वाळुंज इंग्लिश मिडियम स्कूलमु.पो. आव्हाट , ता. खेड ,जि. ,पुणे पिन ४१२४०२ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४२ | पुणे | एकलव्य शिक्षण संस्था राजगुरुनगर डाक बंगलामुवकाम पोस्ट राजगुरुनगर डाक बंगला तालुका खेड जिल्हा पुणे | विद्यासागर इंग्लिश मिडियम स्कूल राजगुरुनगरमु पोस्ट राजगुरुनगर डाक बंगला तालुका खेड जिल्हा पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४३ | पुणे | तुळजाभवानी एज्युकेशन सोसायटीमु.पो.शिरसटवाडी ता.इंदापूर जि.पुणे | तुळजाभवानी इंग्लिश मिडीयम स्कूलमु.पो.निमगाव केतकी | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४४ | पुणे | साई विद्या प्रतिष्ठानबालाजीनगर, मेदनकरवाडी, चाकण, ता - खेड जि - पुणे ४१० ५०१ | होली एंजल्स इंग्लिश मेडीअमस्कूल, वडगाव घेनंद रोड, चाकण ता - खेड जि.- पुणे ४१० ५०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४५ | पुणे | आर्च एंजल एज्युकेशन फाउंडेशन स.नं /७ /२ /२ मांजरी बु. ता. हवेली.जि.पुणे कुंजीर वस्ती | कुंजीर पब्लिक स्कूलस.नं /७ /२ /२ मांजरी बु. ता. हवेली.जि.पुणे कुंजीर वस्ती पिन -४१२३०७ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४६ | पुणे | कन्नड संघ पुणेस.न. ३८, सी.डी.स.स. धा जवळ, गणेशनगर, एरंडवणे, पुणे - ४११०३८. | कावेरी पब्लिक स्कूलस.न.: ३५, वडगाव शिंदे रस्ता, लोहगाव, पुणे- ४११०४७. | दर्जावाढ | आय.सी.एस.ई | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४७ | पुणे | न्यू एज्युकेशन सोसायटी४४२, सोमवार पेठ , पुणे ४११०११ | एम एच पटेल इंग्लिश मेडिअम प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूल४४२, सोमवार पेठ , पुणे ४११०११ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १०४८ | पुणे | फलक एज्युकेशन सोसायटीस .नं.५ /१ अ , लेन २ ,हाउस ७०४ ,भाग्योदय नगर कोंढवा खुर्द ,पुणे ४११०४८ . | ब्राईट फयुचर स्कूल स.नं ४६ ,कोंढवा खुर्द , पुणे ४१०४८ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |



Certified True Copy
In-Charge
Kaveri International School

CS Scanned with

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१९/प्र.क्र.४१६/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ११ जून, २०१९

प्रस्तावना :-

१. द कन्नडा संघ, पुणे संचलित कावेरी इंटरनॅशनल स्कूल, सर्व्हे नं. ३५, वडगाव शिंदे रोड, लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे या शाळेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर शाळेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासननिर्णय:-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत द कन्नडा संघ, पुणे संचलित कावेरी इंटरनॅशनल स्कूल, सर्व्हे नं. ३५, वडगाव शिंदे रोड, लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे या शाळेस (उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक, इ. ९ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, आय.सी.एस.ई.) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून दर्जावाढ करण्यास शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने लगतच्या तीन वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. या बाबींची पूर्तता न केल्यास सदर शाळेचे मान्यता आदेश आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर

CS Scanned with

शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढशाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्यांचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१) आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे
७) निवडनस्ती (एसएम-२)

CS Scanned with